सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER
कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/2223/1363 दि. 17 मे,२०२३

## परिपत्रक

**विषयः- पदवी प्रवेश प्रक्रिया २०२३-२४ अंतर्गत कृषी व संलग्न विद्याशाखेच्या पदवी महाविद्यालयांनी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या पोर्टलवर नोंदणी करण्याबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत सर्व पदवी महाविद्यालयातील पहिल्या वर्षाची प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येते. मा. आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्या दि.१५/५/२०२३ रोजीच्या पत्रानुसार सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया दि.१२/६/२०२३ पासून राबविण्याचे प्रस्तावित आहे. तत्पूर्वी दि.१६/५/२०२३ ते दि.२६/५/२०२३ या कालावधीत सदर प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रविष्ठ होणाऱ्या पदवी महाविद्यालयांनी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या खालील लिंकद्वारे संकेतस्थळावर नोंदणी प्रक्रिया करावयाची आहे.

**https://regugcollege.agriadmissions.in/AgriUGCollegeReg/InstituteLoginRegistration.aspx**

यास्तव राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत सर्व पदवी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या उक्त संकेतस्थळावर विहित मुदतीत महाविद्यालयाची नोंदणी करावी. महाविद्यालयाच्या नोंदणीकरिता शासकीय/अनुदानित/कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांनी शासन निर्णय / मान्यतेचे पत्र तसेच कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांनी संबंधित कृषी विद्यापीठाचे ना हरकत प्रमाणपत्र, शुल्क नियामक प्राधिकरणाचे चालू शैक्षणिक वर्षाकरिता ग्राह्य असलेले शुल्क निश्चितीचे पत्र संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावे. याचबरोबर नोडल अधिकारी,

त्यांचे संपर्क क्रमांक, ई-मेल पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक, वसतीगृह सुविधांची मुले/मुली यांची क्षमता इत्यादी माहिती देण्यात यावी.

महाविद्यालयांनी उक्त संकेतस्थळावर नोंदणी न केल्यास अशा महाविद्यालयांचा प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करता येणार नाही व याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

१७/५/२०२३

(उत्तम कदम)
संचालक (शिक्षण)

प्रति,

सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य,
चारही कृषी विद्यापीठांतर्गत सर्व पदवी महाविद्यालये.

प्रतः- कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

यांना सूचित करण्यात येते की, महाविद्यालयांनी नोंदणी करण्यासाठी दि.१६/५/२०२३ ते दि.२६/५/२०२३ हा कालावधी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने निश्चित केलेला आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र असलेल्या आपल्या कार्यक्षेत्रातील कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सत्वर करावी. तथापि, कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांना 'ना हरकत प्रमाणपत्र' देतेवेळी संबंधित महाविद्यालय आवश्यक त्या सर्व निकषांची पूर्तता करत असल्याची खातरजमा करण्यात यावी. याचबरोबर पात्र महाविद्यालये 'ना हरकत प्रमाणपत्रा'पासून वंचित राहणार नाही, याचीही दक्षता घेणे आवश्यक आहे. अन्यथा याची जबाबदारी सर्व संबंधितांवर राहील. सदर परिपत्रकाबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पदवी महाविद्यालयांना अवगत करण्याचेही सूचित करण्यात येते.

प्रतः- मे. विबास टेक्नोलॉजी , पुणे यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

प्रतः- १. मा. आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सलसियर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ यांना माहितीसाठी सविनय सादर...

२. मा.महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर..

महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:maharashtra.cetcell@gmail.com

क्र. रासाप्रपक/कृशिप्र १३२३/मकृशिवसंप,पुणे/शै.व.२३-२४/केंप्रप्र/मनों/ १००५ दिनांक : १५/५/२०२३

प्रति
संचालक (शिक्षण)
महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परीषद,
१३२/ब, भांबुर्डा, भोसले नगर,
पुणे – ४११ ००७

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मधील कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राबविण्यात येणाऱ्या केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिये संदर्भात.....**

संदर्भ : १) मा. राज्यपालांनी संमतीनुसार विधीमंडळाचा सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अध्यादेशान्वये प्रसिध्द् करण्यात आलेला दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ रोजीचा अधिनियम.

२) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांची (असाधारण क्रमांक १९२) दिनांक १ जून २०१८ रोजीची अधिसूचना.

३) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांची (असाधारण क्रमांक १७६) दिनांक २३ मे २०२२ रोजीची अधिसूचना.

महोदय,

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात आलेल्या एमएचटी-सीईटी प्रवेश परीक्षेचा निकाल दिनांक १२/०६/२०२३ रोजी प्रसिध्द करण्याचे व दिनांक १२/०६/२०२३ रोजी कृषी व कृषी संलग्न अभ्यासक्रमांसाठी केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया राबविण्याकरीता उमेदवार नोंदणीची प्रक्रिया राबविण्याचे प्रस्तावित आहे. केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया राबविण्यापुर्वी सदरील महाविद्यालयांची नोंदणी प्रक्रिया दिनांक १६/०५/२०२३ ते दिनांक २६/०५/०२३ या कालावधीत सुरु करण्यात येणार आहे.

17/5/2023

परिषद, पुणे – शिक्षण विभाग
आवक/जावक
क्र. 729
दि. 17/5/23

त्याअनुषंगाने आपल्या अधिपत्याखालील चारही कृषी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या कृषी व कृषी संलग्न पदवी अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना उपरोक्त संदर्भाधिन अधिनियम व अधिसूचनांद्वारे केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया राबविण्याच्या टप्प्यांबाबत आपल्या कार्यालयामार्फत् परिपत्रकाद्वारे कळवावे तसेच संबंधित महाविद्यालयांना नोंदणीकरीता Window Open करुन देण्यात येणार असल्याचे कळविण्यात यावे.

जेणेकरुन केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात कोणतीही गैरसोय अथवा त्रुटी न राहता प्रवेशाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडणे शक्य होईल.

आपला

**(महेन्द्र ब. वारभुवन, भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**